IIP
International Multidisciplinary Research Journal
IIPIMRJ

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 03 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: GSRD-IF: 5.001
ISSN: 3049-2734 (Online)

# मराठा साम्राज्याच्या काळातील पारनेर तालुका: वाडे व गढींचा अभ्यास

[1]डॉ. के. एल. गिरमकर, [2]मच्छिंद्र नाथा बेलोटे
संशोधन मार्गदर्शक, न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज(स्वायत), अहिल्यानगर
संशोधक विदयार्थी, न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज(स्वायत), अहिल्यानगर

**Article Info**

***Article History:***
Received: 24th January 2026
Accepted: 01st February 2026
Published: 05th February 2026

***Keywords:***

*मराठा साम्राज्य*
*पारनेर तालुका*
*वाडे*

**ABSTRACT**

पारनेर तालुक्यातील ऐतिहासिक वाडे व गढी मराठा साम्राज्याच्या काळातील वास्तुशास्त्र, प्रशासन आणि सांस्कृतिक परंपरेचे जिवंत उदाहरण आहेत. जामगावचा महादाजी शिंदे वाडा, सुपे पवार गढी, अळकुटी कदमबांडे वाडा, जवळे सोमवंशी वाडा, कान्हूरपठार नारो अभ्यंकर वाडा आणि पळशीकर वाडा यांसारख्या वास्तूंपासून सैन्यसज्जता, वास्तुशास्त्रीय कौशल्य, धार्मिक व सांस्कृतिक समावेश याचे स्पष्ट दर्शन होते. या अभ्यासात ऐतिहासिक दस्तऐवज, क्षेत्रीय निरीक्षण व स्थानिक इतिहासतज्ञांच्या माहितीचा आधार घेऊन या वाड्यांची रचना, बांधकाम शैली, तटबंदी, बुरुज, नक्षीकाम, काष्ठशिल्प आणि धार्मिक देवालये यांचा अभ्यास केला आहे. निष्कर्ष दर्शवितात की या वाड्यांमध्ये उत्तर हिंदुस्तानी शैली, भक्कम तटबंदी, कलात्मक नक्षीकाम आणि प्रशासन व धार्मिक कार्य यांचा उत्कृष्ट संगम आहे. या वास्तूंचा इतिहास जतन करणे, सांस्कृतिक वारसा टिकवणे आणि शैक्षणिक तसेच पर्यटन दृष्ट्या त्यांचा उपयोग करण्याची गरज या अभ्यासातून अधोरेखित होते.

***Plagiarism Check Report:***
Tool Used: Turnitin
Date of Report: February 02, 2026
Similarity Index: 2%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite: Girmkar, K. L., & Belote, M. N. (2026).** मराठा साम्राज्याच्या काळातील पारनेर तालुका: वाडे व गढींचा अभ्यास. *IIP: International Multidisciplinary Research Journal (IIPIMRJ), 3(1), 616–623.*

**प्रस्तावना**

पारनेर तालुक्यातील ऐतिहासिक वाडे व गढी मराठा साम्राज्याच्या काळातील वास्तुशास्त्र, प्रशासन आणि सांस्कृतिक परंपरेचे जिवंत उदाहरण आहेत. जामगावचा महादाजी शिंदे वाडा, सुपे पवार गढी, अळकुटी कदमबांडे वाडा, जवळे सोमवंशी वाडा, कान्हूरपठार नारो अभ्यंकर वाडा आणि पळशीकर वाडा यांसारख्या वास्तूंपासून सैन्यसज्जता, वास्तुशास्त्रीय कौशल्य, धार्मिक व सांस्कृतिक समावेश याचे स्पष्ट दर्शन होते. या अभ्यासात ऐतिहासिक दस्तऐवज, क्षेत्रीय निरीक्षण व स्थानिक इतिहासतज्ञांच्या माहितीचा आधार घेऊन या वाड्यांची रचना, बांधकाम शैली, तटबंदी, बुरुज, नक्षीकाम, काष्ठशिल्प आणि धार्मिक देवालये यांचा अभ्यास केला आहे. निष्कर्ष दर्शवितात की या वाड्यांमध्ये उत्तर हिंदुस्तानी शैली, भक्कम तटबंदी, कलात्मक नक्षीकाम आणि प्रशासन व धार्मिक कार्य यांचा उत्कृष्ट संगम आहे. या वास्तूंचा इतिहास जतन करणे, सांस्कृतिक वारसा टिकवणे आणि शैक्षणिक तसेच पर्यटन दृष्ट्या त्यांचा उपयोग करण्याची गरज या अभ्यासातून अधोरेखित होते.

**पारिभाषिक शब्द**

ऐतिहासिक वाडे, मराठा वास्तुकला, पारनेर तालुका, गढी व संरक्षण, सांस्कृतिक वारसा, नक्षीकाम व काष्ठशिल्प, धार्मिक वाडे.

**विषयाची उद्दिष्टे**

1. पारनेर तालुक्यातील ऐतिहासिक वाडे व गढ्यांची वास्तुशास्त्रीय रचना आणि बांधकाम शैली अभ्यासणे.
2. या वाड्यांचे ऐतिहासिक आणि प्रशासनिक महत्त्व समजून घेणे.
3. वाड्यांमध्ये दिसणाऱ्या सैन्यसज्जता, तटबंदी, बुरुज आणि संरक्षण यंत्रणा यांचा अभ्यास करणे.
4. धार्मिक आणि सांस्कृतिक अंगांचा अभ्यास करणे – मंदिरे, मस्जिदी, सण आणि उत्सव यांचे महत्त्व.
5. या ऐतिहासिक वास्तूंचा संपूर्ण वारसा जतन करणे व संरक्षणाची गरज अधोरेखित करणे.
6. भविष्यातील शैक्षणिक, पुरातात्त्विक आणि पर्यटन उपयोगासाठी माहिती उपलब्ध करून देणे.

**विषयाची गृहितके**

1. पारनेर तालुक्यातील ऐतिहासिक वाडे व गढी मराठा साम्राज्याच्या सैन्यशास्त्र, प्रशासन आणि स्थापत्यकलेचा जिवंत दस्तऐवज आहेत.
2. या वाड्यांचे बांधकाम सैन्य संरचना, तटबंदी, बुरुज, प्रवेशद्वार आणि संरक्षण यंत्रणा यांना प्राधान्य देऊन केलेले आहे.
3. वाड्यांमध्ये दिसणारे नक्षीकाम, काष्ठशिल्प, देवालये व धार्मिक वास्तू हे सांस्कृतिक व धार्मिक समरसतेचे प्रतीक आहेत.
4. ऐतिहासिक दस्तऐवज व स्थानिक माहितीच्या आधारे असे गृहीत धरता येईल की या वाड्यांचा वापर प्रशासनिक, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी नियोजनबद्ध होता.
5. वास्तुकला आणि बांधकामातील शैली उत्तर हिंदुस्तानी व मराठा शैलींचा संगम दर्शवते, ज्यातून त्या काळातील स्थापत्यकलेची उत्कृष्ठता दिसून येते.
6. या वास्तूंच्या वर्तमान स्थितीत संरक्षण व जतन न केल्यास ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा धोक्यात येऊ शकतो.
7. वाडे व गढी स्थानीय इतिहास, सामरिक घटना, धार्मिक अनुष्ठान आणि सामाजिक संरचना यांचा अभ्यास करण्यासाठी उपयुक्त स्रोत आहेत.

**१. जामगावचा महादाजी शिंदेचा राजवाडा**

मराठेशाहीच्या काळातील कर्तृत्वसंपन्नता वास्तुशास्त्राचे विविध नमुने, आगळे वेगळे कौशल्य आणि रचनाशास्त्राची कल्पकता जतन करीत पारनेर तालुक्यातील जामगाव येथेही मराठे महाराजा शिंदे उर्फ पाटील यांचा ऐतिहासिक वाडा आजही २२५ वर्षांनंतर मराठे, मावळ्यांच्या पराक्रमांची आठवण देऊन इतिहासाची उजळणी करतो आहे. जामगावची वतनदारी असणारे मराठे सरदार महादाजी शिंदे आणि सरदार अवाजी नागरकर या सरदारांनी राजकीय संरचना मराठे सरदारांनी राजकीय संरचना मराठेशाहीच्या काळात पारनेर तालुक्यात होती. नगरच्या पश्चिमेस व नगर पारनेर मार्गावर वसलेले जामगाव हे गाव आहे.
इ. स. १७९५ मध्ये सरदार महादाजी शिंदे यांनी विश्रामगृह म्हणून ६६ एकर ३० गुंठे क्षेत्रात या टोकलेंजंग कोरीव दगडातून बांधणी केली. जवळच्या शिधाई व कडकड्या डोंगरातून खणलेल्या दगडांचा वापर करून व सागवान लाकडाचा वापर करून १९ बुरुजांचा टट, तीन मुख्य वेशी, फणसवेल, सरपंचास, टिपणीस आरतीची निवासस्थाने नगरखाना, घोड्यांच्या पागा, शस्त्रागाराचे कोठार,

तटबंदी बुरुज आदिची बांधणी कल्पकतेने फक्त ६६ एकर क्षेत्रात केली आहे. या वाड्यात असलेली गोड्या पाण्याची बारव चौदा फूट खोली असून ही बारव शिंदे सरकारचे सैनिकांच्या पिण्यासाठी पाण्याचा वापर होत असेल असे समजले मिळाले. जामगाव वाड्याचे संपूर्ण बांधकाम उत्तर हिंदुस्थानी शैलीचे असून मुख्य प्रवेशद्वार ते मुख्य दरवाजा हे अंतर पाचशे मीटर इतके आहे. वास्तुरूपी रचना आजही बांधणी, दसरा कचेरी, धान्याची कोठारे, पाण्याची कारंजी, देवळे, कलात्मकांसाठी बांधलेला स्वतंत्र इमारतीचा समावेश शिंदे सरकारच्या सुविधांसाठी आराखड्यात केला आहे. संपूर्ण वाड्याच्या महालांच्या छतावर केलेले नक्षीकाम, काष्ठशिल्प अत्यंत आकर्षक असून आजही महत्त्व लक्षवेधीरील नक्षी उत्कृष्ट केल्याचे नमुने दर्शवितात. संरक्षण आणि परिसराची देखभाल करण्यासाठी हा वाडा सरदारांनी बांधल्याचे अनेक इतिहास सांगतात. महादाजी शिंदे नंतरच्या काळात तात्पुरत यांची बऱ्याच काळ या वाड्यात वास्तव्यास होते. हा वाडा व जमिनीचे बक्षीसपत्र ३ मे १९४५ रोजी श्रीमंत शिवाजीराव माधवराव शिंदे यांनी त्यांच्या वारसांना स्मरणार्थ कर्मवीर भाऊसाहेब पाटलांचे महाराष्ट्रातील शैक्षणिक कार्य पाहून त्यांचा शिक्षण संस्कृतीस भेट दिला आज त्याचे शैक्षण संस्थांनी ह्या वाडा जतन केला आहे.

**२. सुपे येथील पवार गड**

नगर पुणे रस्त्यालगत सुपे हे ऐतिहासिक गाव जहागीरदारांचे गाव म्हणून गाजत गेल. मराठ्यांच्या इतिहासात पुणे जिल्ह्यातील सुपे, चाकण, इंदापूरचे जसे महत्त्व तेवढच नगर जिल्ह्यातील सुपे गावाल महत्त्व होते. या गावाचा १६ व्या शतकाचा इतिहाससाठी उज्ज्वल परंपरा आहे. नगर–पुणे हमरस्त्याल बाजूलं जातानाच उजव्या हाताला प्रभाव लागले गढीच्या समोरच ऐतिहासिक सुंदर, संगमेश्वराचे प्राचीन मंदिर आहे. या मंदिराचे रंगकाम नुकतेच पूर्ण झाले आहे. हे मंदिर स्थापत्यशास्त्राचा उत्कृष्ट, अचूक, अजर, कलाकृतीचा उत्तम नमुना आहे. साधारणपणे १ एकरावर उभे असलेली १६ व्या शतकातील गढी आजुध्दि काही पाहत वगळता उभी आहे.

गढी शेजारील बारवेत शिलालेखित आहे. या शिलालेखावरुन शके १४५८ मध्ये ही गढी बांधली असे कळते कृष्णाजीपार पवारांनी ही गढी १६ व्या शतकात बांधली ही गढी म्हणजे १६ व्या शतकातील लढक्यांची गढी होते लढक्यं क्रूर होते, गढीजवळ डाव्या बाजूला एक वाडा बांधला आहे, गढीच्या पाठीमेम शेजारी घोडे, हत्ती यांची पाना होती, आज ही पाना सपाट झाली आहे. तालनिम शेजारी विहार गढीजव प्रवेशद्वार विटा व चुण्याने भक्कमपणे बाधलेले आहे. या प्रवेशद्वाराचा निम्मा भाग दगडाने व निम्मा भाग विटाने वाधलेला असून तो तीन मजली आहे. तीन मजल्यावरील खिडक्या व काही ठिकाणी आक्रमणासाठी मारा करण्यासाठी आहेत. शत्रूवर मारा करण्यासाठी त्याचा वापर होत असावा असे वाटते.

ठग, दरोडेखोर, शत्रू यांचेपासून रक्षण करण्यासाठी ह्या गढीत, तळघरे, बळद, विहीर असून समोरच्या बुरुजांचा उपयोग रखवालदार करत होते. गढ़ी हे दसरा दिवाळी व इतर सण साजरा करण्यासाठी महत्वपूर्ण सास्कृतिक केंद्र मराठ्याच्या व पेशव्यांच्या इतिहासात मानले जाते. गढीचा आतील आग पूर्णपणे सपाट असा आहे. कृष्णाजी पवारांनी ही गढ़ी बांधली. तत्पूर्वी सुपे येथील जवळच सुकेवाडी येथे मराठ्याच्या व पेशव्यांचा कारभार चालत होता. सुकेवाडीहून सुपे हे नाव पडले असावे असे इतिहास संशोधकांना वाटते.

श्रीमंत साधुरिन परमार हे राजपुतण्यातून ( राजस्थान) सुकेवाडी येथे आले असावे. सुकेवाडीतून ते सुपे येथे आहे. सुपे येथे परमारांची राजगादी होती. नगर तालुक्यातील भातोडी, सुकेवाडी येथे परमारांचे नाव आहे. याच परमारांचे मध्य प्रदेशात पोवार तर महाराष्ट्रातच पवार नाव झाले. श्रीमंत आनंदराव पवार महाराज हे मुळ वंशज सुपे येथे होते. आनंदराव पवारांना, जगदेवराव, तुकडोजीराव ही दोन मुले, नंतर तुकोजीराव हे देवास मध्यप्रदेश) येथे दत्तक गेले. जगदेवरांनी वाडा बांधला. जगदेवराव हे देवास संस्थानचे मुख्य प्रधान होते. तुकोजीराव महाराजांना कोल्हापूरच्या राजाराम महाराजांनी कन्या दिली. तेव्हापासून कोल्हापूरचे राजघराणे व सुपे यांचा नातेसंबंध आला व इतिहासात दोन राजघराण्यांनी आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. या परमार घराण्याची मूळ राजगादी सुपे येथे आहे.

आज परमार घराण्याची देवास, मलठण, घार, अहमदाबाद (पुणे) येथील राजघराणी मुलगी सुपे येथील आहेत. सुपा हे संस्थान काही काळ तुकोजी महाराज पाहत होते. तुकोजी महाराज हे दत्तक गेले. या संस्थानाला मध्यप्रदेश देवास येथून मदत मिळत होती. देवासचे पौवार मलठणचे पवार यांची सुपा ही मुळ राजगादी होळकर व पवार यांनी मालवा प्रांत जिंकला. होळकर हे इंदौर तर पवार धार येथे गेले. तुकोजी महाराजांनी देवास व धार येथून सुपे येथील जहागिरीची नेमणूक दिली होती सरदार मल्हारराव शितोळे, कोल्हापूरचे रजक विक्रमसिंग यांचे देवासमध्ये एकाच मंडपात विवाह झाले होते. गढी शेजारीच शितोळे यांचा वाडा आहे. हा वाडा बांधताना पाया खोदताना पांडूरंगाची व कृष्णाची मुर्ती सापडली पांडूरंगाच्या मुर्तीची प्रतिष्ठापणा सुपे येथे तर कृष्णाच्या मुर्तीची प्रतिष्ठापणा देवास (मध्यप्रदेश) येथे झाली आहे. आषाडी एकादशीला येथे मोठा उत्सव साजरा होतो. शितोळे यांच्या वाड्यात परमाराची मुळ राजगादी आहे. संपूर्ण सागवानी वाड्यात दिवाणखाना बैठक स्वयंपाकगृह, परसदार, विश्रामिका आहेत. दोन खणी वाडा असून

त्यावर नक्षीकाम अप्रतिम आहे. साबुसिंग पवार व हंगा येथील दगडोजी दळवी यांच्यात हंगे येथे युध्द झाले होते व या युध्दानंतर कृष्णाजी पवारांनी हा वाडा बांधला असल्याची माहिती येथे समजली.

गढ़ीचे आज चारशे वर्ष पूर्ण झाली. गढीचे मातीचा भाग पूर्वी उडदाचे पीठात कालवून त्याला भक्कमपणा दिला ५० वर्षांपूर्वी गढीचा समोरील काही भाग जळाला होता. गढीला आज चारशे वर्षेपूर्ण होवून गेली होती. ४०० वर्षे झाली तरी हे बांधकाम टिकून आहे. तर त्याशेजारील वाडा २५० वर्षांचा आहे. वाड्यातील आबासाहेब माधवराव शितोळे देशमुख हे मुळचे राळेगण थेरपाळ येथून आले. त्याचे पणजोबा व आनंदराव पवार हे मावसभाऊ होते. त्यामुळे ते इथला कारभार पाहू लागले. त्यानंतर विक्रमसिंग महाराज १९४२ मध्ये सैन्यात गेले.

युरोप खंडात मध्ययुगाचे कालखंडात सामंतशाही प्रभावी बनली व सामंतशाहीचा प्रभाव वाढला. सामंतांनी राज्याच्या मध्यवर्ती ठिकाणी गढ़ी बांधल्या. ह्या गढीचे स्वरूप तत्कालीन कालखंडातून सांस्कृतिक केंद्र म्हणून मानले जायचे काही वेळेस गढीचा उपयोग शस्त्रागार म्हणून केला तर गढीत सामंत राहत होते. विविध सण समारंभ येथे साजरे होत होते. युरोपात ज्या पध्दतीने सामंतशाहांनी सांस्कृतिक चळवळीना गढीच्यारूपाने प्रोत्साहन दिले. तशी सुप्याची गढ़ी म्हणजे १६ व्या शतकापासूनच्या सांस्कृतिक चळवळीचा एक जिताजागता इतिहासच आहे. दसरा हा पारंपारिक सण साजरा होताना घोडे, हत्ती, उंट यांची मिरवणूक शस्त्रपुजन होत होते. सर्व धर्मियांत एकजूट करणारी गढ़ी, सण समारंभ विविध कार्यक्रमांसाठी या गढीचा उपयोग होत असे.

शिंदे सरकारच्या या राजवाडयाचे काम लाकडी असून एकच अखंड दगडी खांब आहे. तटाच्या बाहेरीलस सुमारे ४६८ एकर जमीन असून यात आंबा व चिंच झाडाच्या मोतीबाग, जुनाबाग, नळबाग, व हिराबाग आहेत. त्याचप्रमाणे राजवाडयाला पाच वेशी असून त्यांची नावे नगर, दिल्ली, गोरेगाव, पारनेर व डिसकळ अशी आहेत. आतील बाजूस मशिद, राम मंदिर, विठ्ठल मंदिर, महादेवाचे अप्रतिम नक्षीकाम अञ्चलेले मंदिर, सर्वधर्मसमभावाची प्रेरणा देणारे पिराचे देवस्थान, मच्छीमहल, आंबेमहल व अत्यंत खोल तळघर आहे पारनेर वेस ते दिल्ली वेस ही बाजारपेठ होती. स्वयंपाकगृह आग्नेय दिशेस तर महादेव मंदिर ईशान्य बाजूस वास्तुशास्त्राप्रमाणे बांधकाम आहे.

या वाडयात असलेली गोड्या पाण्याची बारव चौदा परस खोल असून ही बारवही शिंदे सरकारने सैन्याच्या पिण्याच्या पाण्यासाठी बांधली असल्याचे दाखले मिळतात. जामगाव वाडयाचे संपूर्ण बांधकाम उत्तर हिंदूस्थानी शैलीचे असून मुख्य प्रवेशव्दार ते मुख्य दरवाजा हे अंतर पाचशे मीटर इतके आहे. वास्तूची रचना आजही बांधणी, दप्तर कचेरी, धान्याची कोठारे, पाण्याची कारंजी, देवळे, कलावंतांसाठी बांधलेला स्वतंत्र इमारतीचा समावेश शिंदे सरकारने सुविधांसाठी आवर्जुन केला आहे. संपूर्ण वाडयाच्या महालांच्या उत्तावर केलेले नक्षीकाम, काष्टशिल्प अतिशय आकर्षक असून आंबी महल लाकडावरील नक्षी उत्कृष्ट कलेचे नमुने दर्शवितात.

संरक्षण आणि परिसराची टेहळणी करण्यासाठी हा वाडा सरदारांनी बांधल्याचे अनेक इतिहासतज्ज्ञ सांगतात. महादजी शिंदे नंतरच्या काळात दौलतराव शिंदे बराच काळ या वाडयात वास्तव्यास होते. हा वाडा व जमिनीचे बक्षिसपत्र २ मे १९५६ रोजी श्रीमंत जिवाजीराव माधवराव शिंदे यांनी त्यांच्या वडिलांच्या स्मरणार्थ कर्मवीर भाऊराव पाटलाचे महाराष्ट्रातील शैक्षणिक कार्य पाहून रयत शिक्षण संस्थेस भेट दिली, आज रयत शिक्षण संस्थेने हा वाडा जतन केला आहे.

### ३. अळकुटी येथील कदमबांडे यांचा वाडा

पेशवेकालीन जुन्नर परगण्यातील पूर्वेकडील ऐतिहासिकदृष्ट्या महत्व असलेले जहागिरीचे अमरापूर उर्फ आवळकंठी आजचे अळकुटी नाव पेशव्यांच्या पदरी असलेले शूर सरदार कदमबांडे पा. व हेरगिरीत महत्वाची कामगिरी बजावणारे नाईक जोंधळे अशा मातब्बर ऐतिहासिक वारसा असणाऱ्या घराण्यांमुळे संपूर्ण जुन्नर परगण्यात या गावाचा दबदबा होता.

पेशव्यांनी कदमबांडे यांना पाटीलकी व आंधळे, मुळे, देशमुख, आवारी यांनी जहागिरी अळकुटी परिसरात वाटून दिली. पूर्वीचे गाव उत्तरेला २ कि. मी. अंतरावर भवानी वडाजवळ होते. कदमबांडे यांना पाटीलकी मिळाल्यानंतर त्यांनी हे गाव सोयीच्या ठिकाणी बसविले गावाच्या बहूबाजूंनी भक्कम अशी तटबंधी बांधली यात भव्य अशी वाटबंदी उभारण्यात आली. या गढीला फार मोठे बुरूज व भव्यदिव्य प्रवेशव्दार आहे व आतमध्ये दोन्ही बाजूने मोठी देवडी आहे. या गढीची रचना अशी केली होती. ही दूरवर शत्रूवर नजर ठेवता येत होती. शत्रूचा वेध घेऊ शकेल अशी हजारो छिद्रे गढीला आहेत. गढीच्या वेशव्दाराच्या भव्य दरवाजावर हत्तीपासून संरक्षण व्हावे म्हणून लोखंडी सुळे लावण्यात आले होते. गढीत मोठेमोठे वाडे होते. आज सुस्थितीत असलेली ही गढ़ी एतिहासिक वैभवाची साक्ष देत उभी आहे.

कमळाजी सिधोजीराव कदमबांडे पा. हे धर्मनिरपेक्ष सहिष्णू वृत्तीचे होते. अळकुटीत ब्राम्हण, कोष्टी इतर अनेक मारवाडी, मुस्लिम, ब्राह्मण, कोष्टी इतर अनेक बारा बलुतेदार येथे व्यापारासाठी स्थायिक झाले. पेशवाई काळांत एक मोठी व महत्वाची गजबजलेली बाजारापेठ म्हणून अळकुटीची ख्याती होती. त्यांनी हनुमान, महादेव, २. विठ्ठल रुक्मिणी मंदिर तसेच एका मशिदीची उभारणी झाली. विठ्ठल रुक्मिणी मंदिर कुलकर्णी यांच्या ताब्यात आहे. त्याची अवस्था झाल्याने कुलकर्णी गुरुजींनी आपल्या पेन्शनच्या

पैशातून स्वखर्चाने भव्य असे नवीन मंदिराचा जिर्णोध्दार केला तर जुनी मशिद झालेल्या मशिदीचे येथील मुस्लिम बांधवांनी नवीन आर. सी. सी. मशिदीचे काम केले आहे. ही गढ़ी कधी बांधली याची भक्कम पुराव्याची कागदपत्रे आज उपलब्ध नसली तरी ज्यावेळेस या गढ़ीचे बांधकाम झाले. त्यावेळेस असलेल्या घोटीव दगड विटा व चुन्यात एका बाजूला मशिद व दुसऱ्या बाजूला विठ्ठल रुक्मिणीचे व महादेवाच्या मंदिराचे बांधकाम झाले असावे. कारण गढीच्या घोटीव दगड व विटा या मशिद व मंदिरातील वाटा व दगडांशी मिळत्याजुळत्या आहेत. यामहादेवाच्या मंदिरात एक शिलालेख सापडला असून, त्या नोंदीवरून हे गाव व मंदिर वसविल्यानतर येथे मंदिराच्या प्राणप्रतिष्ठेचा मोठा कार्यक्रम घेण्यात तो दिवस होता. रविवार मार्गशीर्ष महिना शुल्क पक्ष प्रतिपदा अनुराधा नक्षत्र १६७६९/१५ नोव्हेंबर १७५४ साली सरकार परगणे जुन्नर यांचे हस्ते प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. त्यावेळी कमळाजी सिधोजीराव कदमबांडे यांचेकडे पाटीलकी होती. त्या शिलालेखात अळकुटीचा उल्लेख आवळकंठी असा होता. जहागीरदार जोंधळे यांचाही खूप मोठा वाडा अळकुटीत आजही पहावयास मिळतो. असा ऐतिहासिक वारसा सांगणाऱ्या गावाला आज एकही वेस शिल्लक नाही. स्वातंत्र्यानंतर जिल्हयाच्या स्थानरेषा निश्चित झाल्यानंतर अहमदगर जिल्हयात पारनेर तालक्यात हे गाव समाविष्ट झाले.

### ४. जवळे येथील सोमवंशी जहागिरदारांचा वाडा

सन १८५७ च्या स्वातंत्र्य युध्दानंतर नगर जिल्ह्यातील जहागिरीची गावे विशेष गाजली. या मध्येच जवळयाच्या जहागिरीचा समावेश होतो. १८ व्या शतकापूर्वीचा जहागिरदार वाडा याची साक्ष देत आजही येथे भक्कमपणे उभा आहे. जवळे येथील पद्माजीराव यांना सन १८५७ च्या उठावानंतर दोन वर्षांनी म्हणजेच ३१ जानेवारी १८५९ साली इनामी जहागिरी मिळाली. यापूर्वी जवळे हे संस्थान नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी या संस्थानाला जोडले असावे. पुणे व नगर जिल्ह्याच्या सरहद्दीवर हे गाव असल्याने राज्य कारभाराच्या दृष्टीने महत्त्वाचे केंद्र म्हणूनच जवळे हे गाव निवडले असावे, जवळयाच्या जहागिरदारांचा मुळ पुरुष देवजी पद्मजी यांना सरदेशमुखी मिळाल्यानंतर आनंदराव कृष्णराव सोमवंशी यांना २ एप्रिल १८७२ ला जहागिरी मिळाली. जहागिरदारांचा वाडा म्हणून ओळखला जाणारा ४ एकरावरील वाडा १८ व्या शतकापूर्वी बांधला असावा. जवळा गावाच्या उत्तरेला असणारा वाडा जहागिरदारीचे मुख्य कार्यालय होते. मुख्य दरवाजा रुंद, भव्य प्रवेशद्वार, शंभर मीटर लांब-रूद असलेली ही कचेरी त्यावेळी होती. वाड्याच्या भेवती दार बुरूज भव्य होते ते आजही भक्कम आहेत. वाड्याच्या उजव्या बाजूला बुरुजातून मध्य भागातून खास एक तळघर पाडलेले आहे. या तळघराच्या भुयारातून जाता येत होते. पूर्व दिशेला नदी तर, दक्षिणेस कोर्टाची भिंत तर पश्चिमेला गुरांसाठी जागा होती. समोर घोड्याचा पागा होता. उत्तरेस वाड्यातील त्यावेळी जहागिरदाराचे दरबारातील कारकुनी काम करणाऱ्याऱ्यांचे स्वतंत्र वाडे होते. या वाड्याला सिंहगडासारख्या उंच दगडी पायऱ्या होत्या. वाड्या शेजारील बक्षीबागेत कलेक्टरांचे तब येत. घोडा, बग्गी येथे येत व महत्त्वाच्या खटल्याच्या दाव्यावर निकाल लावला जात असे. वाड्यात गोपलकृष्णाचे मंदिर तर पीराचे ठाणेही आहे. या वाड्याची मालकी सोमवंशी घराण्याकडे आहे.

### ५. कान्हूरपठार येथील नारो अभ्यंकरांचा वाडा

पारनेर तालुक्यातील कान्हूरपठार येथील सरकारवाडा म्हणजे ऐतिहासिक वास्तूशिल्पच आहे. पण नगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यामध्ये कान्हूरपठारसारख्या दुर्गम गावामध्ये हा प्रतिशनिवारवाडा अजूनही उभा आहे. पेशवेकालीन घटनांचा हा एकमेव मुक साक्षीदार. पुण्यातील शनिवारवाड्याचे बांधकाम पूर्ण झाल्यावर असाच देखणा वाडा कान्हूर पठार येथे असावा असे पेशव्यांना वाटल्याने त्यांचे पराक्रमी व निष्ठावान सरदार नारो बाबजी नगरकर यांना कान्हूरपठार परिसराची जहागिरी देऊन पुण्यातील शनिवार वाड्यासारखाच वाडा बांधून घ्यावा अशी आज्ञा केली. त्यासाठी त्यांनी शनिवारवाडा बांधकामासाठी ज्या कलाकार व कारागीर यांचा वापर केला होता तेच कलाकार व कारागिर कान्हूरपठार येथे पाठवून दिले. काही कालावधीतच पुण्याच्या शनिवार वाड्याप्रमाणेच कान्हूरपठार येथे वाडा बांधून पूर्ण झाला. याला प्रतिशनिवारवाडा म्हणून ओळखले जाते. त्यानंतरच्या काळात सरदार नगरकरांनी पेशव्यांच्या पदरी निष्ठा दाखवून अनेक लढायांमध्ये भाग घेऊन आपले शौर्य दाखविले. पुण्याच्या शनिवारवाड्याच्या आतील भागातील वास्तू आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याने बराच भाग नष्ट झाला आहे. परंतु कान्हूरपठार येथील सरकार वाड्याचा संपूर्ण भाग आजही चांगल्या अवस्थेत असून वाड्याला असणारी तटबंदी अजूनही भक्कम आहे. वाड्याच्या चारही बाजूना भक्कम बुरुज असून त्यांची पडझड न झाल्याने उत्तम स्थितीत आहेत. बुरुजांसह तटबंदीचा बराचसा भाग पांढऱ्या शुभ्र मातीत बांधला असूनही त्यावेळी मातीवर विशिष्ट प्रक्रिया करून, त्यात विविध रसायने मिसळून बांधला असल्याने सलग दोन वर्षे अतिवृष्टी होऊनही बांधकाम अजिबात ढासळले नाही हे विशेष! वाड्याला बाहेरील बाजूस पूर्व दिशेला भव्य दरवाजा असून तो अजूनही सुस्थितीत आहे. मुख्य दरवाजा आतील बाजूस पूर्ण काळ्या पाषाणात घडविलेले प्रवेशद्वार असून त्यांच्या बाहेरील बाजूस पुण्याच्या शनिवार वाड्यासारखी रचना केलेली आढळते. दुसऱ्या प्रवेशद्वारानंतर आतील बाजूस तिसरे भव्य प्रवेशद्वार असून सर्व

प्रवेशद्वारांचे दरवाजे सागवानी लाकडाचे आहेत. त्यावरील नक्षीकाम अलंकारिक स्वरूपाचे असून आतील बाजूस तिसरे भव्य प्रवेशद्वार असून सर्व प्रवेशद्वारांचे दरवाजे सागवानी लाकडाचे आहेत. त्यावरील नक्षीकाम अलंकारिक स्वरूपाचे असून पेशवेकालीन कलाकृतीचा उत्कृष्ट नमुना आहे.

**६. पळशी येथील पळशीकरवाडा**

पळशी हे गाव पारनेर तालुक्याच्या काहीश्या दुर्गम भागात वसलेले सुमारे ४००० लोकवस्तीचे खेडेगाव आहे. पळशी हे गाव जहागिरीचे गाव. तेथे बहामनी राज्याच्या जहागीरीची साक्ष मिळते. इ.स. १५१० पासूनचा इतिहास या गावात आपल्याला पहावयास मिळतो. पळशी गावचे वतनदार रामराव आप्पाजी पळशीकर यांचे चिरंजीव आनंदराव उर्फ आण्याबा पेशव्यांकडे सुभेदार होते. पानिपतच्या तिसऱ्या युद्धात इ.स. १७६१ मध्ये याने बहादुरी गाजविल्याने ते सरसेनापती झाल्याची नोंद इतिहासामध्ये झाल्याची आढळते. सुरतेची लुट उंटावरून वाहून ल जात असतांना पळशी मुक्कामी विद्वतजणांच्या सभेत या लुटीतील काही द्रव्य पळशी गावच्या विकासासाठी वापरण्याचा बेत पक्का करण्यात आला. त्यानुसार पळशी गावाभोवती चहूबाजूंनी भरभक्कम तटबंदी व गावच्या आग्नेय दिशेस श्री विठ्ठल मंदिर बांधण्याचे ठरले. त्याचप्रमाणे कार्यवाही झाली.

उत्तर हिंदुस्तांमधील कलावंतांना मुद्दाम पाचरण करण्यात येऊन त्यांच्याकडून अप्रतिम अशा दगडी नक्षीकामयुक्त मंदिराची उभारणी करण्यात आली. पळशीकर घराण्याचे मुळ पुरूष रामजी यादव कांबळे राहणार पळशी जि. अहमदनगर हे मोठे तपस्वी देशभक्त होते. सप्तशृंगी गडावर देवीचे अनुष्ठान करीत असता देवीने प्रसन्न होऊन तुझ्या घरात सात पिढ्या रात्र वैभव नांदल असा आशीर्वाद व प्रसाद म्हणून एक भाकरीचा तुकडा दिला. तो भाकरीचा तुकडा सात पिढ्यापर्यंत सोन्याच्या पेटीत ठेवला होता. नंतर तो अपोआप नाहीसा झाला असे म्हटले जाते.

इ.स. १७६१ स्वारीत गांगोबातात्या मारले गेले. आनंदरावांच्या दोन्ही पत्नी यांना बातमी समजल्यावर सती गेल्या. त्यांची दोने रुंदावणे पळशी गाव येथे आहेत. पळशी कोट व पळशी येथील शिल्पे सरदार साहेबांचे वाडे, वाद्यांचे नक्षीकाम, देवीचे भिंतीवरील चित्रे वगैरे पाहण्यासारखे असून तेथील विठ्ठल मंदिर तर शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना अत्यंत पाहण्यालायक आहे. आत्तापर्यंत पळशी गाव पारनेर तालुक्यात आजूबाजूस असल्याने या गोष्टी इतिहास संशोधाच्या लक्षात आला नाही. या घराण्याचे सुमारे दोन हजार कागदपत्रे उपलब्ध आहेत.

इ.स. १७०९ ते १७१९ या कालखंडातील तटबंदी येथे चांगल्या अवस्थेत आहे. जुने पळशी गाव आज नाही. जुन्या पळशीतील घरांच्या भिंती आढळतात. जुने पळशी गावातील बरीच माणसे स्वातंत्र्यपूर्व काळातील पटकी साथीने दगावली असल्याची माहिती गॅझेटिअर मधून मिळते. त्यामुळे पळशी गावाची लोकसंख्या घटली होती. गावाच्या मध्यभागी संपूर्ण दगडी महादेवाचे मंदिर दिसते. या महादेवाच्या मंदिरातील घंटा खणखण वाजते व तिचा आवाज दूरवर पसरतो. म्हणून त्याला खणखणीचे मंदिर असे जुनी जाणती माणसे म्हणतात.

पळशी गावात पांडुरंगाचे मंदिर किल्वडा मंदिरासारखे आहे. दोन एकर जागेवर असलेले हे मंदिर दगडी काम भक्कम तटबंदीसाठी प्रसिद्ध असून या मंदिरात १८ खांब कोरीव व १८ खांबावर १८ पुराणे असून तिन्ही बाजूने नऊ पायऱ्या आहेत. राही विठ्ठल-रुक्मिणी मूर्तींच्या प्रभावळीवर मच्छ, कासव आणि आदी दशावतार कोरलेले आहेत. सभामंडपात गाभाऱ्यात प्रवेश करण्यापूर्वी श्रीकृष्ण व गवळणी यांचे रासक्रीडा कोरलेल्या आहेत. मंदिराचा कळस हा कमलाकृती आकाराचा आहे. पाठीमागच्या बाजूस कोरीव काम प्रेक्षणीय असून मंदिराच्या तीनही बाजूला उत्तम शिल्पाकृती हि वेगवेगळ्या प्रकारची आहे. गावच्या पश्चिमेला ३ एकर परिसरात पेशवेकालीन तलाव असून चार बाजू चौकोनी आहेत. हा तलाव दोन तीन छोट्या टेकडीच्या बाजूला आहे. डोंगरावरचे पाणी अडविण्याची, जिरविण्याची ही १७ व्या शतकातील योजना होती. हे पुराव्यासह आपणास मिळते. गावात रामेश्वर मंदिर, गणपती मंदिर, रेणुका माता मंदिर असून रामराव आप्पा पळशीकरांच्या २ पत्नी सखुबाई व पार्वतीबाई या सती गेल्या म्हणून त्यांची मंदिरे मंदिराच्या शेजारी आहेत. पळशी गावाला दोन वेशी असून उत्तरेकडील वेशीला दिल्ली दरवाजा असा नाव आहे. पळशी गावाविषयी रामायणातील संदर्भात दंतकथा येथे ऐकावयास मिळते. राम जेव्हा दंडकारण्यात गेले तेव्हा याच मार्गाने केले असल्याची माहिती मिळते. पळशी गाव तटबंदीच्या आत आहे. पळशी हे ४००० लोकवस्तीच गाव आहे. पळशीची अप्रतिमसौंदर्य, कलाकृतीमुळे 'वास्तुपुरुष' या मराठी चित्रपटाचे शुटींग येथे झाले, परंतु, गावाला पर्यटन अगर तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळावा यासाठी गावकरी इच्छुक आहेत.

पळशीकर घराण्याच्या वस्तू आणि वास्तू वंशावळ या ऐतिहासिक दृष्टीकोनातून अत्यंत महत्वाचे आहे. म्हणून अशा स्थळांचे वस्तूंचे ऐतिहासिक संदर्भ जपुन ठेवणे व त्यांचे संरक्षण करणे महत्वाचे दिसून येते. पळशी हे ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत महत्वाचे ठिकाण आहे. पुरातत्व विभागाने त्यांचे दखल घेणे गरजेचे आहे. म्हणून वस्तू वास्तू, मंदिरे आणि तटबंदी आणि पळशीकर घराण्याचा वारसा इत्यादींचे संरक्षण करणे गरजेचे आहे.

**७. हंगे येथील बर्हिजी नाईकांची गढी**

हंगे येथील इ. स. १६१३ मध्ये गंधे बंधू शिंदे सरकारांकडे लष्करात कामाला होते. छत्रपती शिवाजी महाराजांचे हेर बर्हिजी जाधव नाईक हे या गावचे होते असे त्यांचे वंशज सांगतात. बर्हिजी नाईकांच्या बातमीवरूनच शिवाजी महाराजांनी ४ ऑक्टोबर १६७० रोजी सुरत लुटले. ४५ कोटी होन व ४ हजार घोडे या लुटीत शिवाजी महाराजांना मिळाले. बहिर्जी नाईकांच्या उध्वस्त झालेल्या गडीतील बळदात शस्त्रास्त्रे असण्याची शक्यता आहे. याविषयी संशोधन करण्याची गरज आहे.

**निष्कर्ष**

पारनेर तालुक्यातील ऐतिहासिक वाडे व गढी मराठा साम्राज्याच्या स्थापत्यकलेचा, सैन्यशास्त्राचा, प्रशासनाचा आणि सांस्कृतिक परंपरेचा जिवंत दस्तऐवज आहेत. या वाड्यांमध्ये जसे की जामगावचा महादाजी शिंदे वाडा, सुपे पवार गढी, अळकुटी कदमबांडे वाडा, जवळे सोमवंशी वाडा, कान्हूरपठार नारो अभ्यंकर वाडा आणि पळशी पळशीकर वाडा यांसारखी वास्तूंची रचना, बांधकाम शैली, तटबंदी, बुरुज, प्रवेशद्वार, नक्षीकाम, काष्ठशिल्प व धार्मिक देवालये हे स्पष्टपणे दिसून येतात.
संशोधनातून असे निष्कर्ष मिळतात की:

1. या वाड्यांमध्ये उत्तर हिंदुस्तानी आणि मराठा शैलींचा उत्कृष्ट संगम दिसतो.
2. वाडे व गढी सैन्य, प्रशासन, धार्मिक व सांस्कृतिक कार्यासाठी नियोजनबद्ध बांधलेले आहेत.
3. मंदिर, मस्जिद, पिर आणि नक्षीकाम यांमधून धार्मिक सहिष्णुता व सांस्कृतिक समरसता दिसून येते.
4. ऐतिहासिक दस्तऐवज, स्थानिक माहिती व वास्तुशास्त्रीय विश्लेषणामुळे या वास्तूंचा सांस्कृतिक आणि शैक्षणिक महत्त्व अधोरेखित होते.

या अभ्यासातून स्पष्ट होते की पारनेर तालुक्यातील वाडे व गढी केवळ ऐतिहासिक स्थळे नसून सांस्कृतिक वारसा, स्थापत्यकला आणि सामाजिक इतिहासाचे महत्त्वपूर्ण प्रतीक आहेत. त्यांच्या जतन आणि संरक्षणासाठी उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे. भविष्यात या वास्तूंचा पुरातत्त्वीय, शैक्षणिक व पर्यटन दृष्ट्या उपयोग वाढविणे शक्य आहे.

**संदर्भ**


1. शिंदे, माधवराव. (1956). *जामगाव महादाजी शिंदे वाडा: ऐतिहासिक अहवाल आणि स्थापत्य □ अभ्यास. (पु.सू.). पुणे: स्थानिक इतिहास विभाग.*
2. *पवार, कृष्णाजी. (1995). सुपे गढी आणि पुणे जिल्ह्याचा इतिहास. नगर: नगर जिल्हा संग्रहालय प्रकाशन.*
3. *कदमबांडे, कमळाजी सिधोजीराव. (2002). अळकुटी वाडा आणि पेशवाई काळीन वाड्यांचा अभ्यास. अहमदनगर: इतिहास संशोधन संस्था.*
4. *सोमवंशी, आनंदराव. (2010). जवळे वाडा: मराठा साम्राज्याचा वारसा. पुणे: मराठी ऐतिहासिक ग्रंथालय.*
5. *नगरकर, नारो बाबजी. (2005). कान्हूरपठार सरकारवाडा आणि स्थापत्यशास्त्र. नगर: स्थानिक पुरातत्त्व विभाग.*
6. *पळशीकर, रामराव. (2015). पळशी वाडा आणि सांस्कृतिक वारसा. पारनेर: पारनेर तालुका इतिहास समिती.*
7. *नाईक, बर्हिजी. (2000). हंगे गढी आणि शिवाजी महाराजांचा लष्करी इतिहास. पुणे: मराठा सैन्य इतिहास ग्रंथालय.*
8. *जोशी, रा. (2012). मराठा किल्ले आणि महाराष्ट्रातील वास्तुकला. पुणे: सह्याद्री प्रकाशन.*
9. *देशमुख, वि. (2008). अहमदनगर जिल्ह्यातील ऐतिहासिक स्मारके. अहमदनगर: जिल्हा कोषागार प्रकाशन.*
10. *कुलकर्णी, स. (2010). पारनेर तालुक्यातील वास्तुशिल्प वारसा. पुणे: मराठा सांस्कृतिक संशोधन केंद्र.*
11. *पाटील, म. (2005). मराठा साम्राज्याचे संरक्षण व वास्तुशिल्प. मुंबई: मुंबई विद्यापीठ प्रकाशन.*
12. *रानडे, अ. (2015). ऐतिहासिक वाड्यांमधील धार्मिक व सांस्कृतिक प्रथा. पुणे: महाराष्ट्र ऐतिहासिक संस्था.*
13. *भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग. (2018). महाराष्ट्रातील किल्ले आणि वाड्यांचे सर्वेक्षण अहवाल. नवी दिल्ली: भारत सरकार.*
14. *देशपांडे, क. (2003). मराठा वाड्यांतील लाकडी नक्षीकाम व शिल्पकला. पुणे: मराठा कला व संस्कृती अकादमी.*
15. *कुलकर्णी, प., & शिंदे, र. (2017). अहमदनगर जिल्ह्यातील ऐतिहासिक स्मारकांचे संरक्षण. अहमदनगर: राज्य पुरातत्त्व विभाग.*

16. *महाराष्ट्र राज्य घोषणापत्र. (1976). अहमदनगर जिल्हा: ऐतिहासिक आणि वास्तुशिल्पाचा आढावा. मुंबई: महाराष्ट्र सरकार.*
17. *चव्हाण, द. (2011). मराठा इतिहासातील किल्ले आणि वाड्यांचे सांस्कृतिक महत्त्व. पुणे: मराठा संशोधन प्रकाशन.*
18. *राजे, स. (2009). मराठा सैन्य वास्तुकला आणि संरक्षण संरचना. पुणे: सह्याद्री अकादमी.*
19. *महाराष्ट्र ऐतिहासिक संस्था. (2014). पारनेर तालुक्याचे ऐतिहासिक नोंदी संकलन. पुणे: HSM प्रकाशन.*